




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १५०

पाने : ०४, किंमत : ०३ रुपये

संपादक : विनोद कैलास गोरे

RNI NO. : MAHMAR/2022/82056

Follow Us On : www.aksharaj.com

Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.११ जानेवारी २०२५


## अजित पवारांचं शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल मोठं विधान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, पुणे :** विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळाल्याचे पाहायला मिळले. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान म हायुतीच्या नेत्यांकडून अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या होत्या. यामध्ये भाजपाचे नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाईल असे जाहीर केले होते. मात्र आता राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याचे अर्थमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या एका विधानामुळे कर्जमाफीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यातील दौंड येथे एका जाहीर कार्यक्रमात आपण आपल्या भाषणात कधीच कर्जमाफीबद्दल बोललो नसल्याचे म्हटले आहे. माझ्या भाषणात कधी तुम्ही कर्जमाफी ऐकलं का? असं विधान अजित पवार यांनी केलं आहे. त्यांच्या या विधानामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार की नाही असा प्रश्न निर्माण आहे.

**अजित पवार नेमकं काय म्हणाले?**

भाषणादरम्यान समोर बसलेल्या एका कार्यकर्त्याला उद्देशून बोलताना अजित पवार म्हणाले की, माझ्या भाषणात कधी तुम्ही कर्जमाफी ऐकलं का?.. मी जेवढी भाषणं केलीतुला एक माहिती आहे का? आंथरूण बघून हातपाय पसरायचे असतात राज्याचा गाडा आपल्याकडे आहे. आपण दोघं नंतर बसू तुला मी माझी परिस्थिती सांगतोमग तू मला तुझा सल्ला दे. मग त्याच्यातून काही जमत असेल तर आपण करू. आपण करायला कमी पडणार नाही.

अजित पवार यांत्या विधानाबरोबरच महायुती सरकारम धील मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते हसन मुश्रीफ यांनीदेखील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल वक्तव्य केलं आहे. विधानसभेच्या निवडणुका आता संपलेल्या आहेत. तीन सिलेंडर देण्याची योजना आम्ही बंद करणार नाहीत. मुलींचं उच्च शिक्षण देखील मोफत सुरु राहील. महिलांना एसटीच्या प्रवासात ५० टक्के सवलत आहे. लाडक्या शेतकऱ्यांचं वीज बील आम्ही माफ केलेलं आहे. अशा अनेक योजना सुरू आहेत. तसेच आता पुढच्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी मग कर्ज माफी करणार आहोत. पाच वर्षात करायची आहे ना?, असं विधान हसन मुश्रीफ यांनी केलं.

**हसन मुश्रीफांचं स्पष्टीकरण**

दरम्यान आपल्या कर्जमाफीसंबंधीत विधानावर नंतर म ुश्रीफ यांन स्पष्टीकरण दिलं आहे, ते म्हणाले की, मी असं म्हटलं की पाच वर्षांचा जाहीरनामा आहे. आर्थिक परिस्थिती पाहून राज्य सरकार कर्जमाफी करणार आहे. सतेज पाटील यांनी थोडी कळ काढावी म्हणून मला तसं बोलावं लागलं.

तसेच ते पुढे म्हणाले की, पाच वर्षांसाठी आपला जाहीरनामा असतो. त्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीची परिस्थिती पाहून योग्यवेळी कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असं स्पष्टीकरण हसन मुश्रीफ यांनी दिलं.

## जिल्हा सहकारी बँकेची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे होणार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकरभरतीतील परीक्षा पुणे येथे सुरू झाली. बँकेत भरती प्रक्रिया पारदर्शक व्हावी. यासाठीच आणि पुणे येथे ऑनलाइन परीक्षेच्या सर्व सुविधा उपलब्ध असल्याने होत आहे. स्वयंघोषित एजंटपासून परीक्षार्थी व त्यांच्या जवळच्या नातेवाइकांनी सावध राहावे, असे आवाहन जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजी कर्डिले यांनी केले आहे. परीक्षा प्रक्रिया १९ जानेवारीपर्यंत चालणार आहे. जिल्हा बँकेच्या ७०० जागांसाठी सुमारे २८ हजारांवर अर्ज आले आहेत. आपल्या मुलाला, मुलीला, जवळच्या नातेवाइकाला नोकरी मिळावी. म्हणून गेल्या काही दिवसांपासून बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालकांकडे कार्यकर्ते, पदाधिकारी, मित्र, नातेवाईक यांची मोठी वर्दळ वाढल्याने बँकेच्या पदाधिकाऱ्यांची ही त्यामुळे डोकेदुखी वाढल्याचे नमूद करत बँकेचे अध्यक्ष आमदार कर्डिले यांनी या संदर्भात सविस्तर भूमिका मांडली आहे. विधानसभेच्या निवडणुकीत कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी प्रामाणिक सहकार्य केले. त्यामुळेच आपला विजय झाला, त्याबद्दल आभारी. परंतु बँकेचा पारदर्शक कारभार सुरू आहे. भरती प्रक्रियाही पारदर्शक व्हावी, गुणवंत विद्यार्थ्यांना भरती प्रक्रियेच्या माध्यमातून न्याय मिळावा. हीच आपली प्रामाणिक इच्छा आहे. प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन सुविधा उपलब्ध होणे आवश्यक होते. तसेच ती अनेक दिवस सुरू राहणार असल्याने शिक्षण संस्था उपलब्ध होणे आवश्यक होते. परंतु शनिवार-रविवार दोन दिवस शाळांना सुटी असते. ज्या शिक्षण संस्था उपलब्ध आहेत. त्यांतील बऱ्याचशा संस्था बँकेच्या संचालक मंडळाशी संलग्न आहेत. तिथे भरती प्रक्रिया झाली असती तर गैरसमज वाढले असते, याकडे आमदार कर्डिले यांनी लक्ष वेधले आहे. बँक भरती प्रक्रियेच्या नावाखाली काही स्वयंघोषित एजंट तयार होतील. ठराविक भाव फुटला असे सांगतील. परीक्षार्थी अथवा त्यांच्या नातेवाईकांशी जवळीक साधून ते फसवणूक करू शकतात. अशा स्वयंघोषित एजंटपासून सावध रहावे, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

## डोंबिवलीत दहशत माजविणाऱ्या भाईला भर रस्त्यात पोलिसांचा चोप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, डोंबिवली (ठाणे) :** येथील पश्चिमेतील महात्मा फुले रस्ता परिसरात दहशत असलेला एक भाई रविवारी रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान महात्मा फुले रस्त्यावरून स्वताची मोटार चालवित होता. या भाईने मोटारीच्या दर्शनी भागाचा प्रखर झोताचा उजेड तांत्रिक बदलाने (अप्पर टिप्पर) समोरून दुचाकीवरून येत असलेल्या पत्रकारांच्या डोळ्यावर मारला. त्यामुळे दुचाकीवरील चालक पत्रकाराला काही क्षण दिसेनासे झाले. तो जागीच थांबला. यावेळी मोटारीतील भाईने दुचाकीला वळण देऊन पुढे जाऊन गाडी थांबवत त्यानंतर पत्रकाराला शिवीगाळ करत मारहाण केली.पत्रकाराच्या तक्रारीवरून विष्णुनगर पोलिसांनी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. फुले रस्त्यावरील स्वामी विवेकानंद शाळेजवळ हा प्रकार घडला.या दहशतीने रस्त्यावरील लोक पळून गेले. दुकानदारांनी दुकाने बंद केली. या भाईच्या इतर सहा साथीदारांनी वाहनातून उतरून दुचाकीवरील पत्रकारांना आणि त्यांना वाचविण्यासाठी मध्ये पडलेल्या चार पत्रकारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एका पत्रकाराचा चष्मा तुटला. हे लोक जाम शहाणे आहेत यांना संपून टाका, असे बोलत पत्रकारांना शिवीगाळ केली. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांना ही माहिती समजताच त्यांनी तातडीने विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांना पत्रकारांना मारहाण आणि जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या भाईला ताब्यात घेण्याचे आदेश दिले. विष्णुनगर पोलिसांनी तातडीने हालचाली करून संबंधित भाईला ताब्यात घेतले. उपायुक्त झेंडे यांनी स्वता आपल्या वर्दीचा हिसका दाखवत भाईला भर रस्त्यात लाठीने झोडपले. त्याला रस्त्यावरच उठाबशा काढायला लावल्या. हा सगळा प्रकार पादचारी पाहत होते. या भाईला अद्दल घडविल्याबद्दल फुले रस्ता, उमेशनगर परिसरातील नागरिक समाधान व्यक्त करत होते.

## जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये तरूणांना संधी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यनगर :** खा.लंके यांनी पत्रकारांशी संवाद साधताना राष्ट्रवादी काँग्रेसम ध्ये येत्या १५ दिवसांत प्रदेशाध्यक्ष पदापासून मोठे संघटनात्मक बदल होतील. अशी चर्चा असल्याचे पत्रकारांनी निदर्शनास आणून दिले असता पक्ष संघटनेच्या विषयावर या बैठकीत चर्चा झाली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची विचार विनिमय बैठक गेल्या दोन दिवसांपासून शरद पवार, प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडत आहे. प्रत्येक सेल प्रमाणे स्वतंत्र बैठक घेण्यात येत आहे. प्रत्येक बैठकीत उपस्थितांची मते जाणून घेण्यात येत आहेत. या बैठकांमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली असून येणाऱ्या कालखंडात पक्षाला कसे पुढे घेऊन जायचे, पक्षाची ध्येय धोरणे घराघरापर्यंत कसे पोहचवायचे यावर विचार मंथन झाले. सध्याच्या स्थितीमध्ये आपण शेतकरी बांधवांना कसा न्याय देऊ शकतो. सरकारला कसे प्रत्युत्तर देऊ शकतो यावर विचारमंथन झाल्याचे खासदार लंके यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आठही खासदार एकसंघ आहेत. कोणीही कोठेही जाणार नसून आम्ही लढणार आहोत. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकांमध्ये तरुणांना संधी देण्याचा निर्णय पक्षाच्या दोन दिवसीय बैठकीत झाल्याची माहिती खासदार निलेश लंके यांनी मुंबईत पत्रकारांशी बोलताना दिली.

## मध्य रेल्वेच्या बदलापूर आणि खोपोली मार्गावर ३ दिवसांचा मेगाब्लॉक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१०, मुंबई :** मुंबईची लाईफलाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उपनगरीय रेल्वेवर बदलापूर आणि खोपोली मार्गावर विशेष ब्लॉक असणार आहे. मध्य रेल्वे मार्गावर दिनांक १० जानेवारी २०२५ आणि १२ जानेवारी २०२५ (शुक्रवार आणि रविवार) रोजी दिवसा कर्जत स्थानकावर पोर्टल उतरवण्यासाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक (दुसरा आणि तिसरा) असेल. मध्य रेल्वे कर्जत यार्ड सुधारणा संदर्भात कर्जत स्थानकावरील पोर्टल अनलोडिंगचे काम पूर्ण करण्यासाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक परिचालीत करणार आहे. हे मेगा ब्लॉक्स पायाभूत सुविधांच्या देखभाल आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक आहेत. प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

**दुसरा ब्लॉक :-**

पुढीलप्रमाणे ब्लॉक आहे:

ब्लॉक दिनांक: १०.०१.२०२५ (शुक्रवार दिवस)

ब्लॉक कालावधी: ११.२० वाजता ते १३.०५ वाजता (०१ तास ४५ मिनिटे ब्लॉक)

**वाहतूक ब्लॉक विभाग:**

भिवपुरी रोड आणि पळसदरी स्थानकांदरम्यान अप, डाउन आणि मिड लाईन (क्रॉस ओव्हर वगळून)

ब्लॉक कालावधीत उपनगरीय गाड्यांचे संचालन पुढील प्रमाणे असेल..

ब्लॉक कालावधीत नेरळ ते खोपोली दरम्यानच्या उपनगरीय सेवा रद्द राहतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ९.३० ते ११.१४ दरम्यान कर्जत साठी सुटणाऱ्या गाड्या नेरळ येथे शॉर्ट टर्मिनेट करण्यात येतील.

कर्जत येथून सकाळी ११:१९ ते दुपारी १:०० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस करीता सुटणाऱ्या गाड्या नेरळ येथून शॉर्ट ओरीजनेट करण्यात येतील.

११०१४ कोइम्बतूर-लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस कर्जत-पनवेल मार्गे वळवली जाईल आणि कल्याण येथे उतरू इच्छिणाऱ्या प्रवाशांसाठी पनवेल येथे थांबेल.

**तिसरा ब्लॉक :-**

ब्लॉक दिनांक: १२.०१.२०२५ (रविवार दिवस)

ब्लॉक कालावधी: १३.५० वाजता ते १५.३५ वाजता (०१ तास ४५ मि निटे)



**वाहतूक ब्लॉक विभाग:**

पळसदरी आणि भिवपुरी रोड स्थानकांदरम्यान अप, डाउन आणि मिड लाईन (क्रॉसओव्हर वगळून)

दरम्यान या मेगा ब्लॉकच्या काळात गाड्यांचे वेळापत्रक पुढील प्रमाणे असेल

* बदलापूर आणि खोपोली स्थानकांदरम्यान उपनगरीय सेवा उपलब्ध राहणार नाहीत.

* छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १२.२० वाजता सुटणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - खोपोली आणि

* छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १३.१९ वाजता सुटणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कर्जत उपनगरी गाडी अंबरनाथ येथे शॉर्ट टर्मिनेट होईल.

* छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १३.४० वाजता सुटणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कर्जत उपनगरी गाडी बदलापूर येथे शॉर्ट टर्मिनेट होईल.

कर्जत येथून १३.५५ वाजता सुटणारी कर्जत - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ट्रेन आणि खोपोली येथून १३.४८ वाजता सुटणारी खोपोली - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ट्रेन अंबरनाथ येथून सुटेल. तसेच, कर्जत येथून १५.२६ वाजता सुटणारी कर्जत - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ट्रेन बदलापूर येथून सुटेल.

* ट्रेन क्रमांक २२१९४ ग्वाल्हेर - दौंड एक्सप्रेस दुपारी २:५० ते ३:३५ पर्यंत चौक येथे रेग्युलेट करण्यात येईल.

## तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास २१०० कोटींचा आराखडा मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे सादर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, धाराशिव :** महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारने १ हजार ३२८ कोटी रुपयांचा निधी छत्रपती संभाजी नगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर केला होता. तो आराखडा आता अंतिम करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार २ हजार १०० कोटी रुपयांचा परिपूर्ण अंतिम विकास आराखडा राज्य शासनाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी आज मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. आता लवकरच या अंतिम विकास आरखड्यास मंजुरी मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र वैश्विक दर्जाचे करण्यासाठी आपण मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहोत. जगभरातील भाविक तुळजापुरात यावे आणि त्यातून मोठ्या प्रमाणात अर्थकारणाला बळकटी मिळावी व त्यातून हजारोंची रोजगार निर्मिती व्हावी हे त्यामागील उद्देश आहे. संकल्पित आराखड्याचे आपण दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी जनतेसमोर सादरीकरण करून त्यांच्या हरकती व सूचना मागवल्या होत्या.

आपल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर १६ सप्टेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजी नगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत एक हजार ३२८ कोटींचा निधी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी आपल्यामहायुतीसरकारने मंजूर केला होता. त्यानंतर २८ जुलै २०२४ रोजी परिपूर्ण विकास आराखडा तयार करण्यासाठी संकल्पना स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी रीतसर निविदाही प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार सहभागी झालेल्या विविध वास्तुविशारद कंपन्यांनी अधिक परिपूर्ण असे सादरीकरण केले. त्यातून गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात आलेल्या संकल्पनेचा अंतिम आराखड्यात समावेश करण्यात आला असल्याचे चित्र आमदार पाटील यांनी सांगितले.तुळजाभवानी देवीचे क्षेत्र वैश्विक दर्जांचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित व्हावे यासाठी सर्वसमावेशक प्रक्रियेचा अंगीकार करण्यात आला आहे. २० जून २०२४ रोजी या आराखड्याचे पुन्हा एकदा सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर १५ जुलै २०२४ रोजी आराखड्याची इत्यंभूत माहिती मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. शहर आणि परिसरातील नागरिकांच्या सूचना व हरकती मागवून घेण्यात आल्या. नागरिकांच्या सूचना, आक्षेप जाणून घेण्यासाठी २० जुलै रोजी आपण स्वतः शहरवासीयांसोवत बैठक घेतली.

आलेल्या सूचनांवर निर्णय घेण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन केली. पुजारी, भाविक व शहरवासीयांच्या सूचनांचा अभ्यास करुन योग्य आक्षेप व सूचनांचा आरखड्यात नव्याने अंतर्भाव करण्यात आला त्यामुळे प्रस्तावित आरखड्याची प्रकल्प किंमत रु.१३२८ कोटींवरून रु.२१०० कोटी एवढी झाली असल्याची आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.




## येसुदास

आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८५ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# साहेब... नायलॉन मांजावर बंदी घाला हो...

आशा-आकांक्षांचे पंख लेवून आकाशात स्वैर विहार करणारा पतंग पाहून अनेक जण प्रफुल्लित होतात. आपल्या हाती असलेल्या दोऱ्याला जोडलेला पतंग आकाशात डोलतोय याचे अप्रूप पतंग उडवणाऱ्याला तर असतेच, पण त्याला साथ देणाऱ्या आणि पाहणाऱ्यांनाही आनंदी करणारा तो क्षण असतो. जगात कुठेही अत्यंत कमी किमतीत मिळणारे हे हलके खेळणे अनेक अर्थांनी जीवनाचे तत्त्वज्ञानही सांगते. आकाशात झेपावतानाही आपले पाय जमिनीवर आहेत, हे विसरता कामा नये. मातीशी, मूळ तत्त्वांशी असलेली नाळ तुटली की आपण कोणत्याही क्षणी जमिनीवर येऊ शकतो. आकाशात झेप घेणे हे काही एका झटक्यात होणारे काम नाही, त्यासाठीही अनेक प्रयत्न करावे लागतात. एकदा आकाशात गेल्यावर अर्थात यशस्वी झाल्यावर आपल्याला काही धोका नाही, या भावनेने गाफील राहू नये, आपण कधीही काटाकाटीचे बळी ठरू शकतो, हे तत्त्वज्ञानही पतंगबाजी शिकवते. जमिनीवरून हळूहळू आकाशाकडे झेप घेतली तरच त्याचा अथांगपणा लक्षात येतो, ही शिकवणही पतंग देतो. भारतीय आणि जगातील काही देशांच्या संस्कृतीत पतंगबाजीला विशेष महत्त्व आहे. हिवाळ्यातच पतंग उडवण्याचे आणखी एक कारण म्हणजे सकाळपासून थंडीत काकडणाऱ्या बच्चे कंपनीला तसेच मोठ्यांनाही गच्चीवर किंवा खुल्या मैदानात सूर्याची नैसर्गिक ऊब मिळते. एकूणच सकारात्मक तत्त्वज्ञान शिकवणारा, कुटुंबीयांना, मित्र-मंडळींना आनंद देणारा हा खेळ जेव्हा स्पर्धेची रंगत घेताना मर्यादा ओलांडतो, तेव्हा मात्र त्यातील नकारात्मकता अधिक जिव्हारी लागते. पूर्वी साधा दोरा किंवा अतिधारदार नसलेला मांजा वापरून पतंग उडवणे, काटाकाटी खेळणे, कटलेला पतंग पकडण्यास धावणे, असे चालत असे. आजही याप्रकारे पतंग खेळले तर ते ठीकच राहिल. परंतु या स्पर्धेसाठी आज नायलॉन धागा, प्लास्टिक, काच, धातूचा चुरा आणि विविध रसायने लावलेला धोकादायक मांजा वापरणे, हे अनेकांच्या जिवावर बेतणारे ठरते. पूर्वी मुले मांजा घरी घोटून तयार करत, ते तसे कमकुवतच असे. मात्र आजघटकेला मांजा दुकानातूनच चांगला मजबूत असा रेडिमेट मिळू लागला आहे. या अनुषंगाने संक्रांतीच्या पहिल्या वहिल्याच दिवशी अतिशय निराशाजनक, क्लेषदायक, दुःखद बातम्या धडकू लागतात, तेव्हा प्रियजनांच्या या महोत्सवाबद्दल काय प्रतिक्रिया उमटत असतील? याची कल्पना न केलेलीच बरी! त्यांचा टाहो आनंदाने रंगीबेरंगी पतंगाने फुललेला आसमंत चिरून टाकतो, अहो साहेब, अशा बाजारातून मिळणाऱ्या रेडिमेट मांजावर बंदी घाला होऽऽ! नाहीतर कोणीतरी जीवघेण्या या पतंग उडविण्यालाच पायबंद लावा



होऽऽऽ...!!

अंगाचा थरकाप उडविणाऱ्या बातम्यांच्या हेड लाइन्स टिव्हीवर व पेपर्सवर अशा असतात- पतंगाच्या नादात तरूण पडला इमारतीवरून... जयपूरमध्ये कैक लोक पतंगबाजीत रमले खरे, मात्र मांजाने ३०० जण घायाळ. ...या शहरातील सर्वच रुग्णालयांमध्ये पतंगबाजीमुळे जखमी झालेल्या रुग्णांच्या रांगाच रांगा. सवाई मनसिंग रुग्णालयात २२७ पेक्षा जास्त रुग्णांवर उपचार सुरू. कटलेला पतंग पकडण्याच्या नादात चार वर्षांचा मुलगा गच्चीवरून पडला, त्याच्या मेंदूला गंभीर इजा झाली. तर एक तरुण दुचाकीखाली आल्याने दोन्ही पाय गमावून बसला. मांजाने चिरला शिक्षकाचा गळा. मांजाने सोलले पाणी भरणाऱ्या युवतीचे पाय. देशभरातील विविध राज्यांमध्ये अशी कित्येक उदाहरणे सापडतील. नाशिकमध्ये पतंग उडवताना इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून पडल्याने सुफियान निजाम कुरेशी हा १७ वर्षीय युवक मृत्युमुखी पडला. अकोल्यात दोघे जखमी तर राहत्यात आणखी एकाचा बळी गेला. अनेकदा दुचाकी चालवताना गळ्याशी केव्हा मांजा येतो आणि कधी गळा चिरून जातो, हे कळतही नाही. अशा दुर्घटनांमुळे बळी गेलेल्यांची, जखमींची संख्याही मागील काही वर्षांत वाढली आहे. इतकेच नव्हे, तर आकाशच ज्यांचे निसर्गदत्त विहार करण्याचे हक्काचे स्थान आहे, त्या पक्ष्यांसाठीही मांजा काळ ठरला आहे. माणसे जखमी झाल्यावर उपचारासाठी धावाधाव तरी करतात. पण मुके प्राणी, पक्षी कोणत्या कोपऱ्यात रक्तबंबाळ होऊन पडतात, याचा थांग लागणे कठीणच. यासाठी अनेक पक्षिप्रेमी आणि सजग नागरिक, संस्थांनी जनजागृती कार्यक्रम हाती घेतले आहेत. पतंग उडवताना सतर्क असणे, आपल्या तसेच इतरांच्या जिवावर ते बेतू नये, याची काळजी घेणे तसेच धारदार मांजाचा वापर कटाक्षाने टाळणे, अशी काही पथ्ये पाळण्याबाबत जनजागृती करण्यात येते. त्याला पतंगवेड्यांनी उत्तमप्रकारे प्रतिसाद दिला पाहिजे.

भारतात पतंग उडविण्यावर बंदीच आहे. पतंग उडविणाराला लाखो रुपयांचा दंड ठोठावून कडक कारवाई करण्याचे कायद्यात नमूद आहे. मात्र हा कायदा अजूनही बासनात गुंडाळून ठेवला गेला आहे. तो आजच्या घडीला उघडण्याची नितांत आवश्यकता भासत आहे. बाजारात मिळणारा रेडिमेट मांजा प्रथमात प्रथम बंद करण्यात यावा. जीवघेण्या मांजाच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर भारतभरच मोहीम सकारात्मक अर्थाने प्रभावीपणे राबवली पाहिजे. शाळा, महाविद्यालयांमध्ये घातक मांजा वापरणारच नाही, अशी प्रतिज्ञा घेण्यात यावी. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, हरित लवाद यांनी घातलेली बंदी कडक करावी. पोलिसांचे सहकार्य आणि नागरिकांनी दाखवलेली सजगता यामुळे चिनी, नायलॉन मांजाची विक्री कमी झाल्याचे आढळले पाहिजे. त्यामुळे दरवर्षीचा पतंगोत्सव असुरक्षिततेची भावना काही प्रमाणात का होईना कमी करणारा ठरला पाहिजे, यात हयगय होता कामा नये. राज्यभरातील पतंगप्रेमींनी हा कित्ता आवर्जून गिरवला पाहिजे. पतंगोत्सव साजरा करताना थोडे समाजभान ठेवले तर आनंदावर विरजणही पडणार नाही, तसेच भविष्यात पतंगबाजीवर सरसकट बंदीचा धोकादेखील उद्भवणार नाही. खरे तर हिवाळ्यातील थंडी आणि उन्हाचा एकत्रित अनुभव देणारा पतंग आपल्या भावी पिढ्यांनाही आनंददायी ठरावा, यासाठी आपणच काळजी घ्यायला नको का? पशू, पक्षी, मानव यांना घातक ठरणाऱ्या जीवघेण्या नायलॉन मांजाची आपणच खरेदी वा विक्री केली नाही तर होणाऱ्या घटनांना आपोआप ब्रेक लागेल, यात दुमत नाहीच!

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरुजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

## मानवतेच्या रक्षणासाठी सनातन धर्माचे रक्षण होणे आवश्यक- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**दि. १०, मुंबई :** सनातन धर्म हा केवळ धर्मच नाही; तर ती जीवन पद्धती आहे. सनातन धर्माने प्रत्येक धर्माचा स्वीकार व आदर केला आहे. सहिष्णुता व सर्वसमावेशकता ही सनातन धर्माची बलस्थाने आहेत. त्यामुळे मानवतेच्या रक्षणासाठी सनातन धर्माचे रक्षण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

राज्यपाल राधाकृष्णन यांनी मुंबईतील महाराणी अहिल्यादेवी होळकर मैदान गोरेगाव येथे सुरु असलेल्या ४ - दिवसांच्या हिंदू आध्यात्मिक आणि सेवा मेळाव्याला गुरुवारी (दि. ९) संबोधित केले, त्यावेळी ते बोलत होते.

मेळाव्याचे आयोजन हिंदू आध्यात्मिक व सेवा फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतातील लोक स्वभावतःच धर्मनिरपेक्ष आहेत. दयाभाव येथील संस्कृतीचा भाग आहे. त्यामुळेच कोरोना महामारीच्या काळात भारताने कोविड लस स्वतःपुरती न वापरता जगातील गरीब देशांना देखील विनामूल्य उपलब्ध करून दिली,



असे राज्यपालांनी सांगितले. त्यामुळे मानवतेच्या सेवेसाठी भारताला बलशाली होणे आवश्यक आहे, असे राज्यपाल म्हणाले.

यावेळी राज्यपालांनी मेळाव्यात आयोजित प्रदर्शनाला भेट दिली. हे प्रदर्शन दि. ९ ते १२ जानेवारी पर्यंत सुरु राहणार असून या भारताच्या समृद्ध सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणे हा या मेळाव्याचा उद्देश आहे, असे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाला हिंदू आध्यात्मिक आणि सेवा फाउंडेशनचे राष्ट्रीय संयोजक गुणवंत सिंह कोठारी, शारदा रामप्रकाश बुबना,सीए के सी जैन, गिरीश भाई शहा तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## लग्नाचे आमिष दाखवून तरूणाकडून लैंगिक अत्याचार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, कल्याण (ठाणे) :** कल्याणमध्ये राहत असलेल्या एका २९ वर्षाच्या तरूणीची तमीळनाडूतील पेंदुराई येथील एका २९ वर्षाच्या तरूणाने लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक केली आहे. मागील चार वर्षापासून हा तरूण तरूणीला आपण लग्न करू, असे सांगून तिच्यावर वेळोवेळी लैंगिक अत्याचार करत होता. या तरूणाने लग्नाचे आमिष दाखवून वेळोवेळी आपल्यावर लैंगिक अत्याचार केले म्हणून तरूणीने बुधवारी खडकपाडा पोलीस ठाण्यात तरूणा विरुध्द तक्रार दाखल केली.

पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. फसवणूक झालेली तरूणी व्यावसायिक आहे. या तरूणीची ओळख व्यवसायाच्या माध्यमातून चार वर्षापूर्वी तमीळनाडू येथील एका २९ वर्षाच्या तरूणा बरोबर झाली. नियमितच्या बोलण्यातून त्यांच्यात प्रेम संबंध जुळले. तरुणाने तरुणीला 'मी तुझ्यावर प्रेम करतो. आपण लग्न करू,' असे वेळोवेळी सांगितले. तरुणाच्या बोलण्यावर तरुणीने विश्वास ठेवला. विवाह होणार असल्याने तरूणाने पीडित तरुणीलागोवायेथील हॉटेलमध्ये दोन वेळा, त्यानंतर तरूणीच्या कल्याणमधील घरी येऊन जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला.

**ना पास..**

नो डिटेंशन पॉलिसी
रद्द करणारं आता
नापासा ढकल पास
नको करायला वृथा

आता तपासली जाई
मुलाची खरी क्षमता
फाजीललाड कशास
काय कामाची ममता

छात्र होतीलं चलाख
अभ्यासा पुन्हा रमता
झोपहीलागेल निवांत
श्रमाने चांगले दमता

समस्त विद्यार्थ्यांमध्ये
हवी समानता समता
नवा निर्णय लाभदाई
संपवूनटाके विषमता

निर्माण करावीचुरस
गणितनव्याने जमता
सरावा सातत्यजरूर
आपसूक ये विनम्रता

दिशा दर्शन पालकां
नको मना संभ्रमता
निर्णयांत हो स्पष्टता
दूरगामी परिणामता

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री

भारतमातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज ५९ वा स्मृतिदिन आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वे मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्वाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. आज ५९ व्या स्मृतिदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## चपलेने मारल्याचा बदला घेण्यासाठी महिलेच्या घरात घुसून तोडफोड

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, पिंपरी-चिंचवड (पुणे) :** महिलेने चपलेने मारल्याचा बदला घेण्यासाठी स्वंयघोषीत भाईने साथीदारांसह महिलेच्या घरात घुसून तोडफोड, लुटमार केल्याची घटना भोसरीतील बालाजीनगर झोपडपट्टी येथे घडली. तसेच हवेत कोयता फिरवत परिसरात दहशत निर्माण केली. याप्रकरणी महिलेने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




बुधवारी रात्री सव्वाअकराच्या सुमारास फिर्यादी महिला घरी झोपल्या होत्या. त्यावेळी आरोपी तिथे आले. फिर्यादी महिलेच्या बहिणीने एका आरोपीला चपलेने मारल्याचा राग मनात धरून फिर्यादी यांच्या दरवाजा व खिडकीवर दगडफेक करीत काच फोडली. त्यानंतर महिलेच्या घरात घुसून त्यांची पर्स नेली. जाताना घराबाहेर ठेवलेली वॉशिंग मशीन आणि दुचाकीची तोडफोड केली. हातातील कोयता हवेत फिरवून 'मी इथला भाई आहे, तुम्ही कोणी मध्ये आलात तर कोणालाच सोडणार नाही', असे म्हणत दहशत निर्माण केली. सहायक पोलीस निरीक्षक पाटील तपास करीत आहेत.


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ठाणे आरटीओ सुरक्षा अभियानांतर्गत क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, ठाणे :** रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांच्या वतीने दि.११ व १२ जानेवारी २०२५ रोजी अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते दि.११ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृह, ठाणे येथे संपन्न होणार आहे. या उद्घाटनाप्रसंगी महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्त विवेक भीमनवार (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी तथा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष अशोक शिनगारे (भा.प्र.से.), ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव (भा.प्र.से.), महाराष्ट्र राज्य अप्पर परिवहन आयुक्त भरत कळसकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. परवाह (केअर) या घोषवाक्याखाली आयोजित या स्पर्धेचा उद्देश रस्ता सुरक्षेचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. नो हाँकिंग चा संदेशही या माध्यमातून देण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी क्रिकेट स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील आणि उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी केले आहे.

## मराठी अभिनेत्री तृप्ती भोईर यांच्यातर्फे गरिब कुटुंबांना मदतीचा हात



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.९, जव्हार (पालघर) :** मराठी सिने अभिनेत्री निर्माती तृप्ती भोईर ज्या अगडबम नाजुका या प्रसिद्ध यांच्या शेल्टर फाऊनडेशन यांच्या सामाजिक संस्थेच्या माध्यमांतून पालघर जिल्ह्यात गेल्या पाच वर्षापासून आदिवासी व गरिब, गरजू कुटुंबांना ग्रामीण कला व विकासाच्या माध्यमातुन रोजगार उपलब्ध करून देत आहे. याच माध्यमातून जव्हार तालुक्यातील वावर वांगणी येथील आदिवासी कुटुंबांना अन्नदान, कला साहित्य, साडी वाटप असे वाटप केले.

मुंबई येथील शेल्टर फाउंडेशन' सदस्य तृप्ती भोईर, शीतल निकम, शारदा फेमिलि फाउंडेशन व रुही हक होपब्लिट यांच्या सहकार्याने वावर वांगणी येथील कुपोषित बालकांना व गरीब कुटुंबांना या दुर्गम भागात २ हजार कुटुंबांना अन्न, शिधा, व साहित्य, ब्लँकेट वाटप केले. साहित्य वाटप कार्यक्रम

ग्रामपंचायत वावर वांगणी येथील रयत आश्रमशाळा येथे पार पाडला. तसेच शाळकरी विद्यार्थ्यांनी मनोरंजनातमक कला सादर केल्या तारपाच्या सुंदर तालावार अभिनेत्री तृप्ती भोईर त्यांच्या सोबत आलेल्या पाहुण्यांनी तारपा नृत्याचा आनंद घेतला.

शेल्टर फोडेंशनच्या माध्यामातून वावर वांगणी ग्रामपंचायत येथील स्थानिक व गरजू लोकांना ब्लँकेट, अन्य घरगुती साहित्य वाटप कार्यक्रमवेळी कॉ यशवंत बुधर जि.प. सदस्य मनीषा बुधर, पं. स. सदस्य ज्योती बुधर उपसरपंच रमेश बीज, ग्रा.सदस्य विजय शिंदे, सुरेश बुधर, कैलास दुमाडा, सायवान कुरबुडे अन्य मान्यवर ग्रामस्थ, नागरीक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खापरखेडा वीज केंद्राच्या वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट स्पर्धेमध्ये २१० मेगावॅट कंत्राटी कामगार संघ विजयी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेच्या अंतिम सामना २१० मेगावाट संधारण विरुद्ध ५०० मेगावाट ११ स्टार्स यांच्या मध्ये खेळण्यात आला, चुरशीचा झालेल्या सामन्यामध्ये २१० मेगावाट संधारण संघाने ५०० मेगावाट ११ स्टार्स संघाचा ६ गडी व १ षटक राखत पराभव केला. नाणेफेक जिंकून ५०० मेगावाट संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला व निर्धारित १० षटकामध्ये ६० धावा उभारल्या ज्यामध्ये शुभम हरडे व राहुल चचाणे यांच्या अनुक्रमे १७ व १४ धावा महत्वपूर्ण होत्या. २१० मेगावाट संधारण संघाची शिस्तबद्ध गोलंदाजी अत्यंत महत्वपूर्ण राहली ज्यामध्ये संघाचा उपकर्णधार प्रशांत पाटील व दिनेश ठवरे यांचा मोलाचा वाटा राहला... प्रशांत पाटील याने आपल्या ३ षटकामध्ये अवघ्या ८ धावा देत १ गडी बाद केला तर दिनेश ठवरे याने आपल्या ३ षटकामध्ये १४ धावा देत ३ गडी बाद केलेत. गोलंदाजी मध्ये लोकेश चिकणकर याने आपल्या २ षटकामध्ये १७ धावा देत १ गडी बाद करून उत्कृष्ट सहकार्य केले. २१० मेगावाट संधारण संघाकडून ऋषिकेश भोयर, रवी रंगारी, गणेश तंतरपाळे, निलेश चिखले, अक्षय अडकीने व नितेश चिकणकर यांचे उत्कृष्ट क्षेत्ररक्षण महत्वपूर्ण होते. ऋषिकेश भोयर यानी भरवश्याचा फलंदाज कमलेश भास्कर याचा टिपलेला झेल हा अप्रतिम होता तसेच त्याचा क्षेत्ररक्षणामुळे मध्यम फळीतील कुशल फलंदाज प्रशांत हाते याला धावचित व्हावे लागले. लक्षाचा पाठलाग करतांना २१० मेगावाट संधारण संघाची सुरुवात खूपचं वाईट झाली व एकवेळ स्थिती ५ षटकामध्ये ३ बाद १८ धावा होत्या. परंतु संघामधील नरेंद्र पून याने सामन्यामध्ये एक टोक सांभाळत उत्कृष्ट फटकेबाजी करीत संघाला विजयी करून दिले. आपल्या फलंदाजीत ४ चौकार व १ षटकार च्या मदतीने संघांसाठी विजयी ३८ धावांचे महत्वपूर्ण योगदान दिले याच विशेष खेळीसाठी सामनावीर म्हणून नरेंद्र पून याला गौरविण्यात आले. स्पर्धेमध्ये मालकावीर म्हणून दिनेश ठवरे (मोनू), उत्कृष्ट फलंदाज म्हणून कमलेश भास्कर तसेच उत्कृष्ट गोलंदाज म्हणून प्रशांत पाटील यांना सम्मानित करण्यात आले. मागील २-३ वर्षांपासून २१० मेगावाट संघ हा ५०० मेगावाट संघास हरत आलेला आहे परंतु यावर्षी २१० मेगावाट संघाने सांघीक खेळ व दिलेल्या रणनीतीचे योग्य अंमलबजावणी करीत संघास विजय मिळवून दिला हे विशेष...

अंतिम सामन्यासाठी महानिर्मिती खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता विराज चौधरी, उपमुख्य अभियंता नारायण राठोड व सुदीप राणे, अधिक्षक अभियंता रविंद्र झलके, अधीक्षक अभियंता संजय तायडे, प्रवीण रोकडे, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, मोरेश्वर राठोड यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

संघटना पदाधिकारी रोशन गोस्वामी, भूपेंद्र चतुर्वेदी, प्रवीण हाते, विनोद बन्सोड, विलास गुजरमाळे, उमेश पारधी, सुमेध चव्हाण अंतिम सामन्यासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## सातारा जिल्ह्यात स्वच्छ माझे अंगण अभियानाला सुरुवात

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.१०, सातारा :** सातारा जिल्ह्यात स्वच्छ माझे अंगण अभियानाला अंतर्गत होणाऱ्या स्वच्छ - सुंदर असणाऱ्या कुटुंबांचा होणार गौरव खंडाळा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविण्याचे गटविकास अधिकारी अनिल वाघमारे यांचे आवाहन नागरिकांनी आपले अंगण आणि परिसर स्वच्छ ठेवावा.

ग्रामीण भागातील सर्व गावांना दृष्यमान स्वच्छतेचा अपेक्षित दर्जा मिळवून देण्यासाठी राज्यव्यापी लोकचळवळ उभी व्हावी. यासाठी शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने दि. १ ते २० जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये स्वच्छ माझे अंगण अभियानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती स्वच्छ भारत मिशन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रज्ञा माने भोसले यांनी दिली आहे. सदर चे अभियान उत्साहात राबविण्या बाबत तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना सुचित करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन (कुटुंबस्तर), सांडपाणी व्यवस्थापन (कुटुंबस्तर) राबवित असलेल्या जिल्ह्यातील सर्व कुटुंबस्तरावर सदर बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन नित्यनियमाने स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्यासाठी जे कुटुंब वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनाकरीता शोषखड्डा, परसबाग, पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपोस्ट खत खड्डा अथवा घरगुती खतखड्डा, कुटुंबस्तरावर कचराकुंड्या याबाबतची उपलब्धता करुन घेतली असून नियमितपणे वापर करतात. अशा कुटुंबांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे अनुकरण करण्याकरीता इतर ग्रामस्थांना, कुटुंब धारकांना त्यांच्या प्रमाणेच वैयक्तिक स्वरुपाच्या स्वच्छतेच्या सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करुन घेण्यासाठी उदयुक्त करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

संबंधित कुटुंबांकडे घरात किंवा परिसरात खालील बाबीं असणे आवश्यक आहे. घरगुती खत खड्डा / परसबाग वैयक्तिक शोषखड्डा / पाझरखड्डावैयक्तिक शौचालय घरगुती कचराकुंड्या सदरील कुटुंबांची निवड करण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालयातील पाणी व स्वच्छता समिती मार्फत दि.२१.०१.२०२५ ते दि.२४.०१.२०२५ रोजी पर्यंत पडताळणी करुन कुटुंबांची निवड करण्यात येणार आहे.

जे कुटुंब कुटुंबस्तरावरील सर्व बाबींची शास्त्रयुक्त पध्दतीने व्यवस्थापन करुन नियमित वापर करतात अशा कुटुंबांना दि.२६ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायत स्तरावर सन्मानित करण्यात येणार आहे.

नुकतेच स्वच्छ माझे अंगण अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी स्वच्छ भारत मिशन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रज्ञा माने भोसले यांनी केले आहे. यावेळी शाळेतील विद्यार्थी, गावकरी यांच्याशी अभियाना बद्दल संवाद साधला, तसेच गावकऱ्यांच्या समन्वयाने शाळा - गाव परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली, परसबागेची पाहणी करून कुटुंबाचा २६ जानेवारी रोजी सरपंच यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

## एचएमपीव्ही व्हायरस ला घाबरायचे नाही...काळजी घ्यायची!

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** सध्या चीनमध्ये एचएमपीव्ही उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. मानवी एचएमपीव्ही विषाणू हा तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलँड्स येथे २००१ मध्ये आढळला. हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे ज्यामुळे श्वसन मार्गाच्या वरील भागातील संसर्गास सर्दी सारख्या कारणीभूत ठरतो.

हा एक हंगामी रोग आहे जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लू प्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो.सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. त्यानुसार वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

तथापि खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी 'काय करावे आणि काय करू नये' या संदर्भातील सूचनांचे पालन करण्यात यावे.नवी मुंबई महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रुग्णालये येथे सर्दी-खोकला अर्थात आयएलआय व सारी रुग्णांवर उपचार करण्यात येतो. एचएमपीव्ही बाबत आरोग्य विभागांतर्गत सर्व रुग्णालये व नागरी आरोग्य केंद्र यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार सार्वजनिक रुग्णालय वाशी, नेरूळ व ऐरोली येथे १० बेड राखीव ठेवण्यात आले आहेत.



तसेच केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होण्याऱ्या सूचनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येईल.नवी मुंबईच्या नागरिकांनी चीनमधून आलेला नवीन विषाणू ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस म्हणजे (एचएमपीव्ही) अहवालाबाबत चिंता करू नये. याबाबत नवी मुंबई महानगर पालिकेमार्फत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भितीचे वातावरण निर्माण करण्याची गरज नाही. तथापि सर्दी-खोकला अथवा फ्लू सदृश लक्षणे आढळल्यास वैयक्तिक स्वच्छता ठेवण्याची काटेकोर काळजी घ्यावी आणि नमुंमपाच्या नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व महापालिका रुग्णालयांतून उपचार घ्यावेत असे आवाहन आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## डहाणू पोलिसांकडून रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन...

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१०, डहाणू (पालघर) :** डहाणू पोलीस ठाण्याकडून डहाणू तालुक्यातील शासकीय आश्रम शाळा आंबेसरी येथे रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम ाअंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. म हाराष्ट्र पोलीस दलाकडून ३६ वे रस्ता सुरक्षा अभियान दिनांक ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ पर्यत अभियान कार्यक्रम शाळा, महाविद्यालय आदी सार्वजनिक ठिकाणी वाहतुक नियमांबाबत जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये रस्ते अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करणे गरजेचे असताना ग्रामीण भागात वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन केले जात असल्यामुळे अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर वाहन चालवण्याचा परवाना आणि वाहन चालवण्याचे प्रशिक्षण घेऊन वाहन चालवले पाहिजे. विनापरवाना वाहन चालवत असताना अपघात होऊन मृत्यू ओढवल्यास विमा कंपन्यांकडून आर्थिक मदत मिळणे अशक्य होते. अल्पवयीन असताना विना परवाना वाहन चालवताना आढळून आल्यास वाहन मालकांना ३० हजारांपर्यंतच्या दंडाची तरतूद असल्याने वाहन




चालवणे टाळावे असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. रस्ते सुरक्षा अभियाना अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने जिल्हा स्तरावर जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे.

या अभियान कार्यक्रमांअंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना महिला सुरक्षा आणि महिलांवरील अत्याचार याबाबत माहिती देण्यात आली, तसेच सध्या सायबर गुन्हेगारीत ऑनलाईन फसवणूकीचे प्रकार वाढले असून याबाबत नागरिकांनी सतर्क राहावे, कोणत्याही ऑनलाईन आमिषाला नागरिकांनी बळी पडू नये, तसेच फसवणूक झाल्यास नागरिकांनी पोलिसांचा आपत्कालीन टोलफ्री नंबर ११२ क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन यावेळी पोलिसांनी केले आहे.

पोलिस हे आपले हे संरक्षणासाठी आहेत, पोलिसांना नागरिकांने नेहमीच सहकार्य करावे, वाहन चालवताना नागरिकांना वाहतुकीचे नियम पाळावेत, यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रस्ते सुरक्षा आणि वाहतुक नियमांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. वाहतुक नियमांच्या भंग प्रकरणी दंड आणि शिक्षेबाबतची माहिती देण्यात आली. त्यानंतर वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्याशिवाय वाहन चालवणार नाही. तसेच पोलिस नागरिकांच्या संरक्षणासाठी वापरत असलेल्या शस्त्राविषयी ही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.यावेळी

डहाणू पोलिस स्टेशनचे पोलिस हवालदार हेमंत गवळी, सहायक फौजदार रवींद्र डामसे वाहतूक भोलेनाथ गोदके, वाहतूक पोलिस, पोलिस अंमलदार कमलेश वरखंडे, हवालदार सुबोध पवार यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्यध्यापक प्रदीप कुमार जाधव, शिक्षिका कांचन सातवी, सई कडू, संगीता राऊत, शिक्षक अविनाश वळवी, दिपक खोटरे व विद्यार्थी उपस्थित होते.

## ५०व्या कुमार/कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा - हरिद्वार, उत्तर प्रदेश

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१०, मुंबई :** महाराष्ट्राच्या दोन्ही संघानी ५० व्या कुमार/कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत साखळी सामन्यात सलग दोन विजय मिळवीत बाद फेरी गाठण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. अखिल भारतीय कबड्डी महासंघाच्या मान्यतेने उत्तर प्रदेश जिल्हा कबड्डी असो.च्या विद्यमाने रोशनबाग बंदिस्त क्रीडा संकुलात आजच्या सायंकाळच्या सत्रातील 'ग' गटात महाराष्ट्राच्या मुलींनी चुरशीच्या लढतीत चंदीगडला ५१-४७ असे रोखत बाद फेरी गाठण्याचा आपला मार्ग मोकळा केला.

पहिल्या डावापासून रंगतदार ठरलेल्या या सामन्यात विश्रांतीला २२-१८ अशी आघाडी महाराष्ट्राकडे होती. मध्यांतरानंतरच्या खेळात आहे ती आघाडी निसटू न देता महाराष्ट्राने आपला विजय निश्चित केला. वैभवी जाधव, वैष्णवी काळे यांच्या संयमी दमदार चढाया त्यांना साक्षी गायकवाडची मिळालेली बचावाची साथ याने हा विजय मिळविला. महाराष्ट्राच्या मुलींची साखळीतील शेवटची लढत उत्तरांचल संघाशी होईल. आज सकाळी झालेल्या कुमारी 'ग' गटात महाराष्ट्राने मणिपूरचा ५२-३० असा पराभव करीत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात ३१-१४ अशी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने उत्तरार्धात सावध खेळावर भर देत गुणांचे अर्धशतक पार केले. साक्षी रावडे हीचा अष्टपैलू खेळ तिला वैष्णवी जाधवची मिळालेली चढाईची, तर सृष्टी मोरेची मिळालेली पकडीची साथ यामुळे १८ गुणांनी महाराष्ट्राने सामना आपल्या बाजूने झुकविला.

सायंकाळच्या सत्रात मुलांच्या 'इ' गटात महाराष्ट्राने कर्नाटकला ३३-२२असे रोखत बाद फेरी गाठण्याच्या दृष्टीने आणखी एक पाऊल टाकले. विश्रांतीला २३-११ अशी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राला विश्रांतीनंतर कर्नाटकने विजयासाठी चांगलेच झुंजविले. पण पहिल्या डावातील मोठ्या आघाडीमुळे महाराष्ट्राने हा विजय साकारला. अनुज गावडेचा चतुरस्त्र खेळ त्याला समर्थ देशमुख, महेश मोने यांची मिळालेली चढाई पकडीची भक्कम साथ यामुळे महाराष्ट्राने ११ गुणांच्या फरकाने विजय मिळविला. महाराष्ट्राची साखळीतील शेवटची लढत दिल्ली संघाशी होईल. सकाळच्या सत्रात झालेल्या मुलांच्या 'इ' गटात महाराष्ट्राने आसामला ३७-०७ असे सहज नमवित साखळीतील पहिला विजय नोंदविला. पहिल्या डावात लोण देत महाराष्ट्राने २०-०४ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात तोच जोश कायम राखत सामना एकतर्फी केला. ओम् कुदळेचा चतुरस्त्र खेळ त्याला आफताब मन्सुरी, अनुज गावडे यांची मिळालेली चढाई पकडीची साथ यामुळे हा विजय शक्य झाला. महाराष्ट्राच्या मुलांचा 'इ' गटात समावेश असून दिल्ली, आसाम, कर्नाटका हे अन्य संघाचा या गटात समावेश आहे. तर मुलींचा 'ग' गटात समावेश असून चंदीगड, उत्तरांचल, मणिपूर हे अन्य संघांचा या गटात समावेश आहे.

# आ.खरेंच्या प्रयत्नाने मोहोळ मतदारसंघातील 330 शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याचा प्रश्न लागला मार्गी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** जानेवारी २०२३ मध्ये उजनी डावा कालवा फुटल्याने मोहोळ तालुक्यातील पाटकुल परिसरातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पैसे त्वरित द्यावेत. अशी आग्रहाची मागणी मोहोळचे आ.राजू खरे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बैठकीत केली होती. त्यावेळी येत्या ८ दिवसात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पैसे मिळतील अशी ग्वाही जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली होती. त्यामुळे राजू खरे यांच्या पाठपुराव्याने ३३० शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई चा प्रश्न मार्गी लागला आहे. जवळपास ३२ लाख ७७हजार २४० रुपये सोलापूरचे अधीक्षक अभियंता याचे खात्यात जमा झाले असल्याचे आ.राजू खरे यांनी सांगितले आहे. उजनी धरणाच्या डाव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी सोडल्यानंतर दि २९ जानेवारी २०२३ मध्ये पहाटे सहा वाजता पाटकुल तालुका मोहोळ विटे आणि फुलचिंचोली ता पंढरपूर येथील साखळी क्रमांक ११२/ ६५० या ठिकाणी उजनी डावा कालवा अचानक फुटला .कालवा फुटल्याने शेतकऱ्यांचे कोट्यावधीची नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीवरून गेल्या ,अनेकांच्या विहिरीवर बोरवेल गाळाने भरल्या ,ठिबक सिंचन, इलेक्ट्रिक मोटारी वाहून गेल्या तर एका शेतकऱ्याचे घर पडले.



**आ.राजू खरे यांच्या हस्ते होणार वाटप**

वरील शेतकऱ्यांची नुकसान भरपाई मिळावी यासाठी आ. खरे यांनी पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. यामुळेच या शेतकऱ्यांना मिळणारे नुकसान भरपाई चेकचे वाटप ही आ.राजू खरे यांचेच हस्ते करण्यात यावेत आशा सूचनाही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकारी यांना दिलेल्या आहेत.

अर्ध्या तासाच्या कालावधीत शेतकऱ्यांचे होत्याचे नव्हते झाले.हि घटना घडल्यानंतर तात्कालिक आमदार, खासदार विविध वरिष्ठ शासकीय अधिकारी, कारखान्याचे अध्यक्ष यांनी संबंधित ठिकाणी भेटी देवून पहाणी केली. फोटोसेशन झाले. मात्र पुन्हा या नुकसानीची कुणी चौकशी केली ना पाठपुरावा केला. साधे विचारपूस करायला फिरकले सुध्दा नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचा हा प्रश्न २ वर्ष शासकीय फायलीत गुंडाळून गेला होता. मात्र आ.राजू खरें यांनी आपल्या आमदारकीच्या पहिल्याच महिन्यात यावर पोटतिडकीने आवाज उठविला. यामुळेच प्रश्न सोडविण्याचा पहिला मान बळीराजाला मिळाला आहे.

यामुळेच शेतकऱ्यांचा खरा कैवारी असल्याचे दाखवून दिले. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी येत्या आठ दिवसात संबंधित नुकसान भरपाई देण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार ८जानेवारी रोजी या विभागातील प्रमुख अधिकारी आणि आ. राजू खरे यांच्यासमवेत बैठक घेतली. या बैठकीतच निधी जमा करण्याचे निर्देश दिले होते. त्याचे तंतोतंत पालन करीत बैठक संपन्यापूर्वीच सदरचा निधी खात्यात जमा झाला आहे. ही बाब म्हणजे आपल्या पाठपुराव्यास मिळालेले पहिलेच मोठं यश असल्याने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील याचे विशेष आभार व्यक्त केले आहे. मागील दोन वर्षांपासून आपल्याला नुकसान मिळवून देण्यासाठी कोणी पुढे आले नाही.

मात्र अगदी पहिल्याच महिन्यात आपले नूतन आणि कार्यतत्पर आमदार असलेले आ. राजू खरे यांनी पहिल्याच प्रयत्नात आपल्याला न्याय मिळवून दिला. याबाबत शेतकऱ्यांतून ही आ.खरे यांचे आभार मानले जात असून माजी लोकप्रतिनिधीच्या निष्क्रिय कारभारवर नाराजी व्यक्त केली जात आहे.मागील दोन दिवसापूर्वी मुंबई येथे झालेल्या बैठकीत अतिरिक्त मुख्य सचिव दिपक कपूर, कार्यकारी संचालक रजपूत, सचिव संजय बेलसरे, प्रकल्प संचालक राजेंद्र मोहिते, आदिसह जलसंपदा विभागाचे सर्व वरिष्ठ अधिकारी आणि संभाव्य सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे आ. राहूल कुल, आ.अभिजित पाटील, आदी उपस्थित होते.

# जव्हार तालुक्यातजल जीवन मिशन योजनेच्या कामांचा बोजवारा

## 13 गावांत काम पूर्ण, तर ६६ गावांचे काम अपूर्ण

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१०, जव्हार (पालघर) :** जव्हार हे उंचावरील ठिकाण असल्यामुळे या तालुक्यातील अनेक गावांना दरवर्षी पाणी टंचाईचा तिव्र सामना करावा लागतो. कायमची पाणी टंचाईदूर व्हावी म्हणून जलजिवन मिशन योजने अंतर्गत पाणी पुरवठ्याची कामे सुरू असुन सदर कामे नीकृष्ठ दर्जाची होत आहेत. याकडे पाणी पुरवठा विभागाने वेळीच लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.संपूर्ण जव्हार तालुक्यात सध्या १०७ गावापैकी ८९ गावात जिल्हा परिषदकडून काम चालू आहे. त्यापैकी आतापर्यंत फक्त १३ गावांना काम पूर्ण झाले असून ६६ गावांना काम अपूर्ण आहेत. असे एकूण १०६ कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. मात्र याकडे पाणी पुरवठा विभाग याकडे दुर्लक्ष करीत असून, अनेक कामे थातुर मातुर पध्दतीने सुरू आहेत.



पाईपलाईनसाठी वापरण्यात आलेली सामग्री तसेच पाईप व पाईप फिटिंग्स, निकृष्ट पध्दतीने सुरू आहेत. अशा सामग्रीमुळे पाईपलाईन लवकर खराब होऊ शकते, गळती होऊ शकते आणि दीर्घकालीन पाणीपुरवठा सुनिश्चित होऊ शकत नाही. अनेक गावं पाड्यांची पाईपलाईनची कामे अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा अद्याप सुरु झालेला नाही.

> आता पर्यंत १३ गावांना काम आम्ही पूर्ण केले असून उर्वरित शिल्लक असलेले काम लवकरच पूर्ण करण्याचे प्रयत्न करू सध्या ज्या गावात उन्हाळयात पाणी टंचाई निर्माण होते त्या गावात काम चालू आहे.
>
> **– रमेश पाध्ये (पाणीपुरवठा अधिकारी)**
>
> आमच्या गावात खूप दिवसापूर्वी फक्त खोदून ठेवले आहे त्याव्यतिरिक्त काहीच केले नाही. आता काही दिवसांनी गावात पाणी टंचाई निर्माण होईल त्याला जबाबदार राहणार कोण.
>
> **– सुधाकर दांगटे (जांबुळमाथा ग्रामस्थ)**

तसेच निकृष्ट पाईप फिटिंग्समुळे पाणी गळती होण्याचा धोका निमर्णि झाला आहे. जल जीवन मिशन योजनेच्या कामांवर नियमित देखरेख, व्यवस्थापन आणि तपासणीचा अभाव असतो. यामुळे निकृष्ट कामे राजरोसपणे सुरू आहेत. पाणी पुरवठा अधिकारी, आपली टक्केवारी घेऊन गप्प आहेत. तसेच तालुक्यातील ढाढरी, जांबुळमाथा, वावर, बेहेडपाडा, साखरशेत तसेच तालुक्यातील अनेक गावांना ठेकेदारांने तर पाइपलाइन खोदुन काम थांबवले आहे.अशाच प्रकारे अर्धवट कामे टाकुन ठेकेदार पसार झाले आहेत . जल जीवन मिशन योजनेच्या संपूर्ण माची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

# ठाणे जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा - पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, ठाणे :** जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित कराव्यात, संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच कंत्राटदारांनी नेमून दिलेली कामे गांभीर्यपूर्वक लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशा अत्यंत कठोर शब्दात सूचना राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे दिल्या.

राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांच्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. मंत्री पाटील यांनी पडघा, वाशिंद, आसनगाव, चेरपोली, खर्डी येथे भेट दिली.

या दौऱ्यादरम्यान मंत्री महोदयांसमवेत आमदार शांताराम मोरे, ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे, जिल्हा परिषद जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक प्रमोद काळे, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता तन्मय कांबळे आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पाटील म्हणाले की, नुकतीच मंत्रालयात ठाणे आणि शहापूर जिल्ह्याची आढावा बैठक घेण्यात आली. पाणीपुरवठा संबंधित काही योजना आहेत, त्या योजनांची पाहणी करणे, अपूर्ण योजना पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक कार्यवाही आणि अंमलबजावणी गतिमान करणे, त्यासोबतच बंद असलेली कामे बंद का आहेत, त्यासंबंधी अडचणी



काय आहेत, त्या जाणून घेण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन करण्यात आले. या दौऱ्यात स्थानिक आमदार तसेच लोकप्रतिनिधीही सोबत असणार आहेत. आपल्या देशाचा हर घर जल...हर घर नल हा एक ड्रीम प्रोजेक्ट आहे. तो पूर्णत्वास येण्याकरिता हा दौरा आहे. त्यानुषंगाने या दौऱ्यात माहिती घेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

ठाणे जिल्ह्यातील धरणांबाबत सांगताना पाटील पुढे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे याकरिता पाठपुरावा करीत आहेत. धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल, यासाठी आमचे प्रयत्न असणार आहेत.

ठाणे जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत १ हजार ४७ कामे सुरु आहेत. त्यापैकी ७२० नळ पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण असून ३२७ कामे, घरगुती नळजोडणीची आहेत. यामध्ये शहापूर तालुक्यातील ७ कामे अद्याप सुरू झाली नाहीत. याबाबत वनविभागाचे वाईल्डलाईफची परवानगीची ४ कामे प्रलंबित आहेत. तर २ कामे जागेच्या अंतर्गत वादामुळे प्रलंबित तर एक ठिकाणी रस्ता नसल्याने तेथे जाण्याची सुविधा नसल्याने प्रलंबित आहेत.

त्याचप्रमाणे जल जीवन मिशन अंतर्गत सुरु करण्यात आलेली परंतू सध्या बंद असलेली ५१ कामे आहेत. त्यासंदर्भात कार्यवाही सुरू असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

# एचएमपीव्ही विषाणूशी लढण्यासाठी महापालिका आरोग्य यंत्रणा सतर्क

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, पनवेल :** चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर फैलाव झालेल्या एचएमपीव्ही या विषाणूच्या अनुषंगाने मालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. एचएमपीव्ही रूग्णांच्या उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालयात २० राखीव खाटा तसेच एमजीएम रूग्णालया मध्ये ५० राखीव खाटा ठेवण्यात आल्या आहेत. तसेच गरज भासल्यास कळंबोलीतील जुन्या कोविड सेंटर येथे ऑक्सीजनयुक्त ६० खाटा सुरू




करण्याबाबत महापालिकेने तयारी सुरू केली असल्याची माहिती मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.याबरोबरच महापालिकेच्या १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येणाऱ्या सर्व खाजगी रूग्णालयांना एचएमपीव्ही साथरोगाची लक्षणे असणाऱ्या रूग्णांची माहिती राज्य शासनाच्या साथरोग सर्वेक्षण पोर्टलवर अद्यावत करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहेत. तसेच वेळोवेळी महापालिकेच्यावतीने पिडीयाट्रिक टास्क फोर्स मार्फत मार्गदर्शन घेण्यात येईल. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## शिवसेना युवा जिल्हा प्रमुख बालाजी शिंदेंचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.०९, नांदेड :** शिवसेना उबाठा पक्षाचे नांदेड युवा जिल्हा प्रमुख बालाजी पाटील शिंदे यानी पक्षाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. बालाजी पाटील शिंदे हे बिलोली तालुक्यातील नागनी येथील मुळचे असुन ग्रामपंचायती मध्ये उपसरपंच पदा पासुन ते संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष जिल्हा नियोजन समिती सदस्य ते युवा सेना उबाठा जिल्हा प्रमुख पदावर तन मन.. अशा जबाबदारीने काम करत आसताना शहरांसह गाव खेड्यांत तळागाळा पर्यंत पोहचुन कार्यकर्त्यांची फळी निर्माण करत पक्ष वाढीच्या कार्यात त्यांची मोठी धडपड होती. पक्ष कार्याबरोबर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक व अभ्यासपूर्वक मांडणी करणारे तसेच अतिवृष्टी नुकसान, पिक विमा, सोयाबीन –कापूस ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दरवाढी सातत्याने अनोखे आंदोलन शासनदरबारी तक्रारी करत शेतकऱ्यांच्या कुठल्याही भुमिकेसाठी ते सातत्याने पुढाकार घेणाऱ्या अशा या नेतृत्वाच्या पक्ष प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला उभारी मिळाली आहे.

## रामराव मगरे यांना डॉ. शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ पुरस्कार प्रदान

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील पिंपळकौठा(मगरे) येथील प्रगतशील शेतकरी रामराव उर्फ बाळासाहेब शंकरराव मगरे यांना सन २०२४-२५ चा नांदेड जिल्हा परिषदेचा डॉ.शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ पुरस्कार श्रीक्षेत्र माळेगाव येथील कृषि प्रदर्शनामध्ये आ.प्रतापराव पा.चिखलीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, कृषि विकास अधिकारी सचिन कपाळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब बारहाटे व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पिंपळकौठा(मगरे) येथील शेतकरी रामराव शंकरराव मगरे हे गेली अनेक वर्षांपासून आधुनिक पद्धतीने शेती करतात. तसेच ते पारंपारिक शेतीसोबत प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती करतात. त्यांनी शेतीमध्ये केलेल्या विविध उपक्रमांची दखल घेऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते कृषि विभाग जिल्हा परीषद नांदेडचा डॉ. शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ पुरस्कार देऊन सहपरिवार सत्कार करण्यात आला.

रामराव मगरे यांना हा कृषिनिष्ठ पुरस्कार मिळाल्याबद्दल पंचायत समिती मुदखेडचे गट विकास अधिकारी श्रीकांत बळदे,सहा. गट विकास अधिकारी हातमोडे, कृषि अधिकारी कोस्केवार, कृषि विस्तार अधिकारी अरूण घोडसे पाटील,एस.एम. पाटील व संपुर्ण पंचायत समितीचे कर्मचारी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## एपीएमसीतील झोपडपट्टीवरील तोडक कारवाई रद्द करण्याची मागणी

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१०, वाशी (नवी मुंबई) :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकांपूर्वी २०२२ मध्ये झोपडीधारकांसाठी घर देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच स्थानिक वनमंत्री आमदार गणेश नाईक यांनी देखील नवी मुंबईतील झोपडपट्टी धारक बेघर होणार नाहीत असे आश्वासन दिले होते. परंतु पालिका व सिडको वारंवार झोपडी धारकांना नोटीस पाठवून तोडक कारवाई करण्याचे आदेश देत आहे. याचा अर्थ काय समजावा ? असा सवाल स्थानिक झोपडीधारक करीत आहेत.

काही असामाजिक तत्त्व एपीएमसी सेक्टर १९ एकता नगर येथील झोपडपट्ट्यांमध्ये अंमली पदार्थांची विक्री करत असल्याने नाहक कष्टकरी गरीब जनतेला याचा भुर्दंड भोगावा लागत आहे. असामाजिक तत्त्वांवर त्वरित कारवाई करून झोपडीधारकांना न्याय मिळावा, पक्की घरे मिळावी, यासाठी घर हक्क संघर्ष कृती समिती चे राष्ट्रीय उपाध्यक्ष खाजा मीया पटेल यांनी नुकतेच बैठकीचे आयोजन केले होते. पंतप्रधान कार्यालय व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तालय यांच्याकडे पत्र व्यवहार करून तोडक कारवाई थांबविण्याची व अमली पदार्थ विक्री विरोधी कारवाई करण्याची विनंती केली आहे. असे जाहीर करत झोपडी धारकांना बेघर होण्यापासून दिलासा देण्यात आला आहे. या बैठकीला घर हक्क संघर्ष कृति समितीचे उपाध्यक्ष खाजा मीया पटेल, प्रकाश वानखेडे, कैलास सरकटे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पार्किंग कोंडीवरनवी मुंबईत अखेर उतारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नवी मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशातील प्रमुख शहरांमध्ये पुरेशा नियोजनाअभावी पार्किंग व्यवस्थेचा अक्षरश: विचका होत असल्याचे चित्र असतानाच नवी मुंबई महापालिकेने मात्र शहरातील पार्किंग कोंडीवर उतारा शोधण्यासाठी उशिरा का होईना कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेने एक जानेवारी रोजी जाहीर केलेल्या नव्या नियमांमध्ये रहिवासी इमारती, बंगले तसेच मोठया बैठ्या घरांसाठी मुबलक पार्किंगचे नियोजन असेल अशाच पद्धतीने आखणी केली आहे. यासंबंधीच्या फेरबदलांवर राज्य सरकारचा निर्णय अंतिम असणार आहे. वाशीतील सामाजिक कार्यकर्ते आणि नियोजन क्षेत्रातील अभ्यासक संदीप ठाकूर यांनी नवी मुंबईतील पार्किंग व्यवस्थेसंबंधीची एक याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेच्या अनुषंगाने झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने मध्यंतरी नवी मुंबईतील पार्किंग व्यवस्थेचा फेरआढावा घेण्याचे निर्देश महापालिका प्रशासनास दिले होते. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी यासंबंधी कोकण विभागाचे तत्कालीन सहसंचालक जितेंद्र भोपळे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन केली होती. भोपळे यांच्या समितीने नवी मुंबईत माफक आणि पुरेशा पार्किंग व्यवस्थेसंबंधी काही महत्त्वाच्या शिफारशी आयुक्त डॉ. शिंदे यांना सादर केले होते. या शिफारशींच्या अनुषंगाने महापालिकेने एक जानेवारी २०२५ रोजी यासंबंधीची नवी नियमावली जाहीर केली असून यामध्ये नव्या पार्किंग व्यवस्थेत महत्त्वाचे बदल सुचविले आहेत.